भाषांतर प्रक्रिया

संपादक

प्राचार्य डॉ. शोभा इंगवले

प्रा. नयनिका नलावडे

प्रा. डॉ. दीपक गायकवाड

राज्यस्तरीय चर्चासत्र

उद्घाटक मा. डॉ. शोभा नाईक दीपप्रज्वलन करताना
सोबत मा. प्रमिलाताई गायकवाड (सरचिटणीस अ. भा. म. शि. परिषद)
मा. प्राचार्य डॉ. शोभा इंगवले

प्रमुख पाहुणे मा. डॉ. चंद्रकांत पाटील यांचे स्वागत करताना
संस्थेच्या सरचिटणीस मा. प्रमिलाताई गायकवाड

भाषांतर प्रक्रिया

संपादक

प्राचार्य डॉ. शोभा इंगवले
प्रा. नयनिका नलावडे
प्रा. डॉ. दीपक गायकवाड

ज्ञानसूर्य प्रकाशन, पुणे

भाषांतर प्रक्रिया

संपादक

प्राचार्य डॉ. शोभा इंगवले, प्रा. नयनिका नलावडे, प्रा. डॉ. दीपक गायकवाड

आवृत्ती पहिली :

१० जून २०१७

ISBN-978-81-926144-9-6

प्रकाशन क्रमांक : १९

मुखपृष्ठ :

राजश्री जाधव, पुणे

अक्षरजुळणी :

सिद्धी ग्राफिक्स, पुणे

मुद्रण :

श्री गणेश मुद्रणालय, पुणे

किंमत : २२०

© ज्ञानसूर्य प्रकाशन

प्रकाशक व मुद्रक

डॉ. उमा काळे-माळी

मारुती माळी

ज्ञानसूर्य प्रकाशन

सर्व्हे नं. २१५, गंगानगर, पोस्ट फुरसुंगी,

ता. हवेली, जि. पुणे - ४१२ ३०८

भ्रमणध्वनी : ९७६५९०४१०३ /

९८८१२१५३६५

Email : umakaleswati@gmail.com

dnyansuryapublication@gmail.com

अनुक्रमणिका

प्रस्तावना । दीपक बोरगावे । ११

इंग्रजी-मराठी अनुवाद : भाषेची भूमिका । डॉ. शोभा नाईक । ३७

अनुवादप्रक्रिया । चंद्रकांत भोंजाळ । ४९

ललित साहित्याचे भाषांतर: स्वरूप आणि आवश्यकता ।
प्राचार्य डॉ. शोभा इंगवले ।५४

भाषांतर : स्वरूप, व्याप्ती आणि आवश्यकता । डॉ. वेदश्री थिगळे । ५९

अनुवादक सेनापती बापटांचे मराठी सारस्वताला योगदान । डॉ. केतकी मोडक । ६६

इंग्रजी भाषेतून मराठीत अनुवादित कादंबरी । प्रा. दीपक गायकवाड । ७५

भाषांतरकार आवश्यक गुण व महत्त्व । प्रा.डॉ. सुभाष आहेर । ८२

भाषांतरकार मंगेश पाडगावकर । डॉ. महालक्ष्मी मोराळे । ८६

अनुवादित मराठी आत्मचरित्रांचे अनुवाद कौशल्य । प्रा. डॉ. बाबासाहेब रोडे । ९१

अनुवादाचे सांस्कृतिक महत्त्व । प्रा. नाना झगडे । १०१

भाषांतरकाराची भूमिका । प्रा. वैशाली देठे । १०६

मराठीतील अनुवादित कादंबरी लेखन । वंदना सोनवले । ११७

भाषांतर विद्येची व्याख्या, स्वरूप व ललित साहित्यकृतीचे भाषांतर।

प्रा. सारिका थोरात । १२४

भाषांतरप्रक्रियेचे महत्त्व आणि त्यातील अडचणी । डॉ. वैजयंतीमाला जाधव । १३१

अनुवादित साहित्य : व्याख्या, स्वरूप व व्याप्ती । सरिता सोमाणी । १३५

भाषांतराचे महत्त्व आणि प्रकार । प्रा. महेश रणदिवे । १४३

भाषांतर : शास्त्र की कला? । सुनिता देशमुख । १४७

भाषांतरः एक प्रगत कौशल्य । डॉ. प्रभाकर घोडके । १५२

अनुवाद स्वरूप ओर प्रक्रिया । प्रा. दशरथ वाघ । १५६

Translation Studies : Principles and Reader's Perspective | Prof. Dhimate Sangita | 161

Problems In Translation of Vijay Tendulkar's Marathi Plays Into English | Dr. Rajendraprasad Shinde | 169

Challenges face by the library to provide Translation Service for its users
Mr. Prakash Jadhav, Mr. Santosh Khajindar | 179

Translation and its Use in Indian Courts | Ravindra Patil | 186

Marathi Autobiography in Translation | Vivek Khabde | 197

Intricate Pathways: Observations on Translation of Mahesh Elkunchwar's 'Wada Chirebandi' | Dr Deepali Patil | 204

इंग्रजी-मराठी अनुवाद : भाषेची भूमिका

डॉ. शोभा नाईक

आज तंत्रशास्त्राच्याा साह्याने प्रचंड स्वरूपात विकसित झालेल्या दिवसांमध्ये आपण अनुवाद या विषयावर त्यातूनही इंग्रजीतून मराठीत आणि मराठीतून इंग्रजीत संपन्न होणाऱ्या अनुवाद कार्यावर इथे दोन दिवस चर्चा करणार आहोत. त्यामध्ये भाषांतर, रूपांतर, अनुवाद या संज्ञा विचारात घेणार आहोत. तर सर्वप्रथम मी, आजच्या पर्यावरणातील अनुवाद यासारख्या एका अत्यंत महत्त्वाच्या विषयावर चर्चा आयोजित केली त्याबद्दल या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शोभा इंगवले व त्यांचे सहकारी डॉ. नयनिका नलावडे, डॉ. माधव खरात, प्रा. बाबर, प्रा. शेळके, प्रा. गायकवाड यांचे खास अभिनंदन करते. अनुवादाचे महत्त्व किती मोठे असते हे मला ठाऊक आहे. कारण मी स्वत: वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या पण एक राज्यभाषा असणाऱ्या बेळगावसारख्या सीमाभागात राहते. आपण एका भाषेत वावरत असतो आणि आपल्या पुढ्यातील व्यक्ती तिच्या भाषेत वावरत असते. आपली एक भाषाा आाणि आपल्या सभोवताली वावरणाऱ्या माणसाची एक दुसरीच भाषा. अशा पर्यावरणाात आपली भाषा नेमके कोणत्या प्रकारचे काम करत असते? दुसऱ्याची भाषा नेमके काय व कसे काम करत असते? याचा आपल्याकडील जगण्याशी संबंधित विचारही अनुवाद यासारख्या विषय समजून घेताना करता येईल. या संदर्भातून हा विषय केवळ मंचीय न राहता तो भारतासारख्या बहुभाषांचा एकत्रित वावर असलेल्या प्रदेशातील अंतर भारतीचे पर्यावरण व त्यामध्ये असणारे इंग्रजीचे अस्तित्व नीटपणे उलगडण्याचा विषय होईल. त्यामुळे अनुवादासारखा विषय आपण चर्चासत्रासाठी निवडलात याबद्दल अभिनंदन!

आज आपण एकविसाव्या शतकात आहोत. जिथे जागतिकीकरण, उदारीकरण आणि व्यापारीकरण या संज्ञा अवतरल्या आहेत. या शतकाची स्थितीगती विचारात घेतली तर एकीकडे थक्ककारक असे अनेक वैज्ञानिक शोध या जगाला वैशिष्ट्यपूर्ण करत

आहेत. तंत्रशास्त्रे तर चमत्काराला लाजवेल अशी कामे करत आहेत आणि दुसरीकडे संवादाची तांत्रिक साधने जरी विकास पावलेली असली तरीही अनेक महत्त्वाच्या गोष्टी ऱ्हास पावत आहेत. माणसामाणसातील संवाद हरवतो आहे. तांत्रिक साधने हाताशी आहेत; पण भाषा हरवते आहे. भाषा असते म्हणूनच जगण्याला अर्थपूर्णत्व प्राप्त झालेले असते. भावभावनांनी ओथंबलेली माणसाची हृदये दिसतात. बुद्धीला, विचारांना धार येताना दिसते. तारतम्य निरंतर वृद्धिंगत होत जाते. माणसाला माणसाचे व्यक्तिमत्त्व बहाल झालेले असते. त्याचे व्यक्तिमत्त्वच त्याच्या परिसराचे सांस्कृतिकतेचे दर्शन घडवते. त्यामुळे भाषेशिवाय माणूस कसा असणार? भाषेसह असणाऱ्या माणसाला यंत्रवत व्यवहाराची भाषा आणि साहित्याची भाषा यात असणारा फरक कळत असतो. माणसाची साहित्याच्या भाषेशिवायचे जीवन पाहण्याचे प्रसंग जर एखाद्या समाजावर येतील तर त्या समाजाचे साहित्यही हळूहळू आपोआप ठप्प होऊन जाईल.

भाषा ठप्प होते, साहित्य ठप्प होणे या अगदी गंभीर गोष्टी आहेत; पण ज्या भाषा संस्कृतीने अनुवाद हे क्षेत्र सतत सिंचनाखाली राखलेलं असतं तिथं भाषेची ठप्पता जवळ फिरकू शकत नाही. कारण ललित साहित्यकृतींची निर्मिती ही कलावंत लेखकांच्या आंतरिक उर्मीवर अवलंबून असते, किंवा नवनिर्मितीला ठरावीक असे पोषक वातावरण आवश्यक असते असे मानले तरी हे पोषक वातावरण समाजात सतत टिकून राहील याचा नेम काय सांगावा; पण अनुवादावाटे मात्र श्रेष्ठ ठरलेल्या उपलब्ध साहित्यकृतीच्या माध्यमातून ही प्रक्रिया चालू राहील. ज्या कुठल्या दोन भाषेत स्रोत भाषा आणि लक्ष्य भाषा असे प्रवास जेव्हा होत असतात; तेव्हा त्या त्या भाषेची जीवनानुभूती तिची सांस्कृतिक प्रतिमा, इथून तिथे आणि तिथून इथे जाणाऱ्या येणाऱ्या साहित्यकृतीवाटे जिवंत होऊन प्रवाहित होत राहते. कन्नड ज्ञानपीठ विजेते महान प्रतिभावंत शिवराम कारंथ ज्यांच्यामध्ये नोबेलचे सामर्थ्य होते, ज्यांनी आपली लोकरंगभूमी (यक्षगान- दशावतार) आंतरराष्ट्रीय पातळीला पोहचवली ते स्वत: अधूनमधून विविध भाषेतील महान कृती कन्नडमध्ये नेण्याचेही कार्य करीत. (मराठीतील पण लक्षात कोण घेतो ही कादंबरी त्यांनीच कन्नडमध्ये अनुवादित केली) आपली भाषासंस्कृती संपन्न करण्याचे कार्य त्यायोगे होते यावर त्यांचा विश्वास होता. आपले आपल्या भाषेवर प्रेम असेल तर भाषांतराचे कामही कलावंत लेखक हाती घेत असतो. आपण जितक्या वेगवेगळ्या भाषासंस्कृतींची मर्मे समजून घेऊ तितकी आपल्या भाषेची संपन्नता वाढते. कारण समजून घेण्याची माणसाची प्रक्रिया ही त्याच्या

स्वत:च्या भाषेत अधिक नैसर्गिकपणे चालते. अनुवाद या दृष्टीतून पाहता आापली भाषा अधिक संपन्न करतात हे लक्षात येईल.

या पार्श्वभूमीवर विचार करता अनुवाद हे कार्य अनेकदृष्ट्या महत्त्वाचे सिद्ध होईल. पण भारतीयांनी अनुवादाला नवनिर्मितीच्या तुलनेत पाहण्याची सवय लावून घेतली. त्यामुळे अनुवादांना दुय्यम दर्जावर ढकलून आपण मोकळे झालो. वास्तविक आज वेळ आली आहे की अनुवादाकडे पूर्णपणे वेगळ्या दृष्टीतून पाहण्याचा प्रघात पाडला जावा याची. दोन दिवसातील सर्व निबंधातून अनुवादाचे स्वरूप आणि महत्त्व अधोरेखित होईलच; पण अनुवादित कलाकृतीचे सौंदर्य ओंजळीत घेणारे सिद्धांतही त्यातून ठोसपणे पुढे येतील ही अपेक्षा.

आपण अनुवादाला दुय्यम दर्जा कोणत्या कारणामुळे दिला? तर अनुवाद ही काही नवनिर्मिती असत नाही म्हणून मूळ कलाकृती जशी स्वयंभूपणे निर्माण होते; तसा अनुवाद नसतो. अनुवाद ही एक अभिरुचीसंपन्न व्यक्तीने रूपांतरण केलेले कृती. पण जर निर्मिती प्रक्रियेप्रमाणेच आपण आस्वाद प्रक्रियेला, रसिकावर असणाऱ्या जबाबदारीला महत्त्व आहे हे मान्य करत असू तर अनुवाद करणे हे वास्तविक एक प्रकारची आस्वाद प्रक्रियाच आहे हे आपोआप आपल्या लक्षात येईल. मग उत्तम अनुवादाचे निर्मिती स्थान हे श्रेष्ठ आस्वादात असल्याचे आढळेल. आस्वाद प्रक्रिया साहित्य व्यवहाराला पूर्णत्व देणारी प्रक्रिया. साहित्यकृती केवळ आकारास येऊन उपयोग नाही ती वाचकामुळे खरी जिवंत होत असते. जेव्हा तिला वाचक भेटतो तेव्हा तिला जिवंतपणा लाभतो. कारण आस्वादात कलाकृतींच्या सर्व मर्मस्थानाशी संवाद साधण्याचा प्रयत्न होतो. संवाद साधला जाणे याला निर्मितीवेळीही महत्त्व आहे आणि आस्वादावेळीही तितकेच महत्त्व आहे. चांगला अनुवादकही मूळ कलाकृतीशी आस्वाद पातळीवरून संवाद साधत असतो. मूळ कलाकृती नीट समजून घेण्याचा तो प्रयत्न करत असतो. एखादी घटना, एखादी व्यक्तिरेखा जीवनाचे एखादे सत्य, एखादे तत्त्वज्ञान साहित्यकृतीच्या रूपात आकारणे म्हणजे काय झालेले असते याची चांगल्या अनुवादकाला कल्पना जरूर असते. त्याची साहित्यिक जाणीव सर्वांगीण स्वरूपात सखोलपणे विकसित असते. याप्रकारे अनुवादाचे महत्त्व आहेच; पण तरीही मूळ कलाकृती आणि अनुवादित कृती यांत श्रेष्ठ कनिष्ठ ठरविण्याचे प्रयत्न करणे चुकेल की बरोबर होईल हा प्रश्न चर्चेला घेता येईल. पण ही चर्चा मूळ कलाकृती श्रेष्ठ हे ठरविण्याकरिता न होता अनुवादित कलाकृती काय काम करत असते ते

स्पष्ट करण्याकरिता व्हावी. या चर्चेतून अनुवादाकडे पाहण्याची नवी दृष्टी विकसित करण्याची गरज प्रामुख्याने अधोरेखित झाली पाहिजे. यातील पहिली गोष्ट म्हणजे स्वत: अनुवादकाला कोणताही न्यूनगंड स्पर्शता कामा नये. त्याला आधी आपण करत असलेल्या कामाचे महत्त्व नीट समजून आले पाहिजे. कोणती जबाबदारी आपण पार पाडत आहोत हे आपल्याला कळते तेव्हा ते इतरांना कळण्याची शक्यता निर्माण होत असते. मध्यंतरी एका चर्चासत्रात मी अनुवादकांची मनोगते ऐकत असताना हे लक्षात आलं. अनुवादाला दुय्यम समजतात याचे दु:ख मोठे करून पाहण्यापेक्षा त्या कामातून आपण त्या दुसऱ्या भाषेच्या संपर्कात गेल्यामुळे कोणकोणत्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती प्राप्त झाल्या, त्या मिळविण्याकरिता आपण कसे प्रयत्न केले. कधी कधी ठरावीक पद्धतीच्या पलीकडे जाऊन आपण त्या साहित्यकृतीतील न समजणाऱ्या जागा कशा समजून घेण्याचा प्रयत्न केला. कोणाकोणाशी चर्चा केली. अनुवाद करण्याच्या प्रक्रियेने आपल्याला कसे वाढविले अशा गोष्टी आपण अधोरेखित करू शकतो.

अनुवाद म्हणजे फक्त शब्दाला शब्द किंवा वाक्याच्या ठिकाणी वाक्य ठेवत जाणे, पैसा-प्रसिद्धी मिळविण्यासाठी अगर हौसेखातर अगर चिक्कार वेळ आहे तर करून टाकू असे समजून करण्याचे काम नाही. ती गंभीर अशी गोष्ट आहे. अनुवादाच्या माध्यमातून सांस्कृतिक देवाणीघेवाणीसारखी वैशिष्ट्यपूर्ण प्रक्रिया अस्तित्वात येते. अनुवाद सर्व प्रकारच्या साहित्यकृतींचे केले जाऊ शकतात. कविता, कथा, कादंबरी, नाटक इ. साहित्यप्रकाराबरोबरच वैचारिक लेखनाचेही अनुवाद केले जातात. प्रत्येक साहित्यप्रकाराची आपापली एक प्रकृती असते, त्याची विशिष्ट अशी निर्मिती प्रक्रिया असते, आकलन प्रक्रिया असते, साहित्यकृतीत निव्वळ शब्द किंवा वाक्ये असत नाहीत, ती भाषिक कृती आपल्यामध्ये संदर्भाची गुंफण राखून असते. लेखन प्रक्रियेचे हे सर्वांगीण स्वरूप लक्षात येणाऱ्यांनी केलेले अनुवादच उत्तम दर्जाचे अनुवाद असतात.

साहित्यनिर्मिती ही प्रत्येक समाजाची एक महत्त्वपूर्ण अवस्था असल्याचे उत्तम अनुवादक जाणत असतो. समाज असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्याची स्वत:ची अशी एक संस्कृती असते. त्यामध्ये त्याच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक व्यवस्था सामावलेल्या असतात. त्या साऱ्यासह त्याची भाषा असते. एखादा समाज आपलं जीवन किती व कसं समृद्धपणे जगतो ते त्याच्या भाषेवाटेच प्रकटत असतं आणि त्या समाजाच्या व्यवस्थांमध्ये निर्माण झालेल्या शोषण व्यवस्था पीडित माणसांची किती अधोगती करतात

तेही त्याच भाषेने आपल्यात साठवून ठेवलेले असते. तेव्हा अनुवादकाला साहित्यकृतीतील भाषा आणि जीवन, भाषा आणि मानवी संवेदना, भाषा आणि त्या त्या समाजाच्या अनुभूती, भाषा आणि संस्कृती, प्रस्थापित व्यवस्था, भाषा आणि सामाजिक शोषण, भाषा आणि त्या त्या समाजाच्या टप्प्या टप्प्याने होणाऱ्या वाटचाली, भाषा आणि स्वातंत्र्य यांच्यातील परस्पर संबंध नीट दिसलेले असतात. अनुवादकासाठी निवडलेल्या साहित्यकृतीकडे तो संदर्भाची खाण म्हणूनच पाहत असतो. आपल्या भाषेपलीकडल्या समाजाला तो आस्थेने ओंजळीत घेत असतो. आपण ज्या अर्थी चांगला अनुवादक हा शब्दप्रयोग वापरतोय त्या अर्थी वाईट अनुवादक अस्तित्वात असणार.

मार्क्वेझ च्या (blindness) चा भा. ल. भोळे यांनी केलेला मराठी अनुवाद हा अनुवादित साहित्यातील सर्वश्रेष्ठ अनुवाद असे म्हटले जाते. ही कादंबरी आंधळ्या माणसांच्या भावबंधनातून प्रवास करवते. आंधळ्यांचं संपूर्ण अखंड विश्व कवेत घेणारी ही कादंबरी कल्पित आणि वास्तव अत्यंत सामर्थ्याने उलगडत नेते. पु. ल. देशपांडे यांचा एका कोळियाने हा अर्नेस्ट हेमिंग्वेचा अनुवादही चिरस्मरणीय ठरतो. पण जो वाचक फक्त मराठी अनुवादित कृती वाचतो त्याला ती कलाकृती चांगली भिडते आणि मूळ (old man and the sea) हे जो लोक वाचतो त्याला एका कोळियाने ठीक वाटते. (काहीजण तो फसलेला अनुवाद असेही म्हणतात) **ती फुलराणी** या नाटकाचा अनुभवही असाच आहे. Bernard Shaw च्या नाटकावरील Pygmalian वरचा My fair lady हा अप्रतिम सिनेमा पाहता लक्षात येते की इंग्लिश समाजातील स्तरभेद आणि भारतीय समाजातील स्तरभेद यात फार मोठा फरक आहे. सामाजिक घटनांच्या अंतर्गत प्रक्रियेत जे गुंते असतात ते अनुवाद प्रक्रियेतही असणारच. ते उलगडायचे तर प्रत्येक भाषासंस्कृतीने आपली म्हणून जी एक अभिरुची निर्माण केलेली असते, तिचे अभिरुची आणि सामाजिक भेदांच्या वास्तवाच्या संबंधांचे सूक्ष्म पदर पाहावे लागतील. या दृष्टीतून आपण जर जगातील अनुवादित साहित्य उकलू लागलो तर अस्तित्वात असलेले एक अद्भुत आपल्या दृष्टीस पडेल. भाषा आणि अभिरुचीचा, साहित्यकृती या घटनेचा आणि त्या समाजातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पातळ्यांच्या अस्तित्वाचा कसा घट्ट संबंध असतो, त्याचा उलगडा होईल. samuel Backeet चे waiting for Godot (गोदो) हे नाटक समजून घेण्यासाठी काही एक प्रवास व्हावा लागतो. अनुवादकाचा तो प्रवास झाला तरच वाचकालाही तो प्रवास करता येऊ शकेल. म्हणूनच चांगले अनुवाद हे वाचकालाा संपन्न

करणारे विश्व आहे.

आपण आपल्या भाषेपलीकडे जाण्याचा प्रयत्न करणे या अवस्थेचाही विचार अनुवादाच्या सौंदर्यशास्त्रात केला तर बरे राहील. भाषेपलीकडे जाणे याचा अर्थ आपल्या भाषेचा त्याग नव्हे. इंग्रजी भाषेने हा जो प्रयत्न केला त्याच्याकडे पाहता भाषेपलीकडे पोहचणे, इतर भाषा संस्कृतीशी संवाद साधणे म्हणजे काय ते स्पष्ट होईल. इंग्रजी भाषेने ग्रीक, लाटिन, जर्मन, फ्रेंच भाषांच्या संपर्कातून समृद्धी प्राप्त केली. वसाहत काळात जगातील अनेक भाषा संस्कृतीशी तिचा संवाद अस्तित्वात आला. एकोणिसाव्या शतकात मराठीशीही तिचा सेतू निर्माण झाला. या सेतूनिर्मितीच्या प्रारंभकाळाचे चित्र आपण इंग्रजीत लिहिलेल्या आनंदीबाई जोशी हिच्या चरित्रात पाहू शकतो. जयंत धर्माधिकारी, कमलाकर सारंग यांच्या दिग्दर्शनाखाली टोनी खोसला निर्मित आनंदीगोपाळ ही हिंदी मालिका आपल्याला ठाऊक आहे. त्या निर्मितीच्या निमित्ताने श्री. ज. जोशी यांची आनंदीगोपाळ ही मराठी कादंबरी, तिचा आशा दामले यांनी केलेला इंग्रजी अनुवाद. काशीबाई कानिटकर लिखित चरित्र आणि अमेरिकन लेखिकेने लिहिलेले इंग्रजी चरित्र ह्या चारही साहित्यकृतींचा एकत्रित अभ्यास केला गेला. इंग्रजीतून लिहिलेल्या चरित्रामध्ये चरित्र लेखिकेला कुंकू, सागरगोटे या गोष्टी कळलेल्या नसल्यामुळे निर्माण झालेल्या गंमती पाहायला मिळतात. त्या काळात अजून आदानप्रदान नव्हते, भारतीय संस्कृती त्यांना अजून कळलेली नव्हती. त्यामुळे कुंकू, कुंकुमतिलक यांचे महत्त्व त्यांना कळणे शक्य नव्हते. आता जर त्या इंग्रजी चरित्राचा मराठीत अनुवाद करायचा झाला तर गमती तशाच आल्या पाहिजेत. आपण आणि लेखिका यातील फरक अधोरेखित करता येणारे हे काम वैशिष्ट्यपूर्ण असेल. अनुवादकाला स्रोत भाषेची संस्कृती आणि लक्ष्य भाषेची संस्कृती यांची स्वतंत्र अस्तित्वे पुसली जाता कामा नयेत आणि त्यांचे स्वतंत्र रूप ओंजळीत घेऊन त्या दोन स्वतंत्र रूपांमध्ये संवाद साधून देणे म्हणजे काय ते कळणे चांगल्या अनुवादासाठी गरजेचे असते. त्यासाठी मूळचे वातावरण त्या मूळ भाषिक रंगांसह अनुवादात आणले गेले पाहिजे.

शौकत आझमी यांच्या चरित्रातील (जयश्री देसाई) एक उदाहरण हा मुद्दा स्पष्ट करेल. जरी त्याची भाषा उर्दू, हिंदी असली तरीही अनुवाद प्रक्रिया पुष्कळदा सारखी. कैफी आझमी बारा वर्षांचे असतानाच एक प्रसंग आहे. घर माणसाला संस्कृती शिकवत असते. तमीज शिकवत असते हे सांगताना त्यांना आपल्याला झालेली शिक्षा आठवते. बाहेरचे पाहुणे आले होते तेव्हा कैफीना 'तू नमस्कार का केला नाहीस?' असे वडिलांचे

वाक्य येते. येथे 'नमस्कार' ऐवजी 'आदाब' किंवा 'सलाम' हे शब्द येणे अधिक योग्य होते. प्रत्येक संस्कृतीचे प्रतिनिधित्व शब्दांवाटे होत असते त्यामुळे अनुवादकाने शब्दांची निवड विचारपूर्वक करणे आवश्यक. भाषेत ते ते जीवनक्रम प्रकट झालेले असतात त्यांचीही नीट माहिती करून घ्यावी लागते अनुवादकाला. शब्दशः अनुवाद केला तर आशयसूत्रे बिघडून बसतात. इमरोजच्याा 'अमृता प्रीतम आणि मी' मध्ये इमरोज अमृताला म्हणतो 'हम दुपट्टे मिलकर चुना करते थे,'' शौकत आझमीच्याही चरित्रात 'दुपट्टा चुननेका शौक था.' हे वाक्य आहे आणि या वाक्याासाठी 'दुपट्टा निवडण्याचा छंद होता' असे वाक्य कथेचा क्रम बिघडवत असल्याचे वाचनात लक्षात येते. त्याच्या मागोव्यातून त्या वाक्यातील निराळा मूळ संदर्भ कळतो. मुली आपले दुपट्टे रंगात बुडवून ते ओले असतानाच दोघे मिळून त्याला बारीक-बारीक चुण्या करीत. अलीकडची क्रशची फॅशन ही जुनीच आहे तर. इमरोजचे उत्तर प्रदेश हा गतकालीन एक सलग पट्टा या भाषिक कृती आपल्यात साठवून असतात. अनुवादकावरची जबाबदारी मोठी आहे. रेखा देशपांडे यांचा फौजिया सैद लिखित टाबूमध्ये कोठ्यावरचे चित्र वाचत असताना 'चांदनी बिछी थी' या मूळ वाक्याचा अर्थ कळतो. शौकत आझमीच्या चरित्रातही ते वाक्य होते; पण 'फरशीवर चांदणे पसरले होते' असे वाक्य अनुवाद वाचन विस्कळीत करणारे आले होते. वास्तविक संगीताची मैफिल सुरू असताना अंथरलेला उंची गालीचा मळू नये म्हणून त्या संस्कृतीत गालिच्यावर पांढरीशुभ्र चादर अंथरतात, त्या चादरीला 'चांदनी बिछाना' असे म्हणतात! अनुवादक गांभीर्याने साहित्यकृतीचा, तिच्यातील आशयसूत्रांचा, संदर्भाचा, वाक्प्रचाराचा अभ्यास न करता केवळ हौस म्हणून अनुवाद करतात त्यामुळे अनुवाद गंभीरपणे घेतले जात नाहीत. अनुवाद हा अत्यंत महत्त्वाचा साहित्यप्रकार हौशी अनुवादक बदनाम करतात. अनुवादकाला ज्या भाषेत अनुवाद करायचा आहे त्या भाषेवर प्रभुत्व असायला हवे आणि ज्या भाषेचा अनुवाद करायचा आहे त्या भाषासंस्कृतीचे चांगले ज्ञान असायला हवे. अर्थात ते ज्ञान परिपूर्ण असण्याची काही शक्यता नसते; पण साहित्यकृतीचा आशय समजून घेताना अडलेल्या जागाची जाणकारांशी चर्चा तर आपण जरूर करू शकतो.

कुलदीप नय्यरच्या भगतसिंगांवरच्या अनुवादित पुस्तकात लवादाचे कामकाज आता कसे नाटकी बनले आहे हे व्यक्त करताना (Hamlet without the prince of Denmark) हा इंग्रजीतील वाक्प्रचार येतो. त्याचे वाक्य समजून केलेले भाषांतर मजेशीर लागते. लाहोरमध्ये फाशी दिली त्या जागेचे सद्य रूप त्या परिसराला असलेल्या 'शादमान'

(Shadman) नावातून लेखक दाखवू पाहत असावा; पण त्याचा उच्चार 'शदमन' असा केलेला दिसतो. गावांचे, नावांचे उच्चार तेथील संदर्भ घेऊन असतात. कधीकधी त्यामध्ये आशयसूत्र गुंफलेली असतात. अनुवादकाला लाहोरची माहिती असती तर शब्दाचा उच्चार नीट आला असता. शादमान या शब्दाचा अर्थ आहे सुखी आनंदी. शादवरून शादी हा शब्द आहे, शाद विरुद्ध बरबाद हा शब्द आहे. उर्दूत शाद्वाद हे तत्त्वज्ञान आहे. (आपल्याकडेही आनंद संप्रदाय आहे) अशा शब्दाचे अनुवादात स्पष्टीकरण देण्याची गरज असते. shadow of sword या एम. जी. अकबरच्या तलवारीच्या छायेत या अनुवादात रेखा देशपांडे संज्ञा नीट समजून देतात. या ग्रंथात इस्लाम आणि ख्रिश्चनिटी यातील वैराचा इतिहास रेखाटला गेलाय. पॅलेस्टाईन इझरायल भागात जेरुसलेम परिसरात ज्यूंच्या टोळ्या राहत. त्यांना पेगन्स असे म्हणत. ख्रिश्चनिटी व इस्लामपूर्व काळ होता तो. महम्मद पैगंबर यांनी ज्या टोळ्यांना एकत्र करून एका व्यवस्थेत बसवले ते इस्लामी बनले. त्यांच्या बहुपत्नीत्व या संकल्पनेला बायबलमध्ये 'शेलेरा कार्न्हेलिया' मानले जाते. एका धर्माची व्यवस्था दुसऱ्या धर्माला व्यभिचार वाटते. या प्रकारच्या ग्रंथांचे अनुवाद किती जबाबदारीने करावे लागत असतील याची कल्पना येईल. अनुवादकाला स्वतःच्या सर्व भूमिकांतून आधी पूर्णतः बाहेर येऊन कामात झोकून द्यावे लागते. लेखक अकबर यांनी मूळ इंग्रजी वाचकांना गृहीत धरलेले आहे. पण अनुवादकाला तसे गृहीत धरता येत नाही. मूळ कृती वाचकापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी पार पाडणे तारेवरची कसरत असल्यासारखी. त्यामुळे वाचकाची तयार झालेली भाषिक संस्कृती, तेथील संकल्पना संकेत व्यवहार हे सर्व घटक विचारात घेतले जावे लागतात. पुस्तक कोणत्या वाचकांसाठी हा भालचंद्र नेमाडे यांचा मुद्दा तो जरी कोलटकरांसंदर्भात असला तरी इथेही आठवतो. (बायबलमधील 'शेलेरा कार्न्हेलिया' या संज्ञेचा त्यांनी युरोपियन बिशप यांच्या मदतीने अर्थ समजून घेतला.) कुराणातील वचनांचा अनुवाद करताना त्यामधील डौल त्याची विशिष्ट भाषा अनुवादात काही प्रमाणात जरी आणता आली तरी अनुवादकाचा श्रमपरिहार होतो. आंबेडकरांच्या एका लेखात मिल्टनचा एक उतारा उद्धृत केलेला आहे. त्याचा व्यवस्थित पाठपुरावा घेतल्यावर ब्रिटिश राजकारणाच्या संदर्भात ब्रिटिशाना इशारा देणारे ते मिल्टनचे लेखन नीट समजल्यावर अनुवादही सहज बनला.

खुशवंत सिंग यांच्या ट्रेन टू पाकिस्तान च्या अनुवादात (अनिल किणीकर) 'अर्धा भाऊ' या शब्दाची ठेच लागते. इंग्रजी समाजाची संस्कृती आणि मराठी समाजाची संस्कृती

यातील वेगळेपण यातून अधोरेखित होईल. आपल्याकडे इंग्रजीतल्या प्रमाणे 'half brother' ही संज्ञा नाही. इंग्रजीत step brother आणि half brother असे नातेदर्शक शब्द भेटतील. ज्यांचे वडील एक पण आया वेगळ्या तो सावत्र भाऊ आणि ज्यांची आई एक पण वडील वेगळे त्याला तिथे half brother म्हणतात. मराठी व्यवस्थेत हे उपलब्ध नाही त्यामुळे तिथेही 'सावत्र भाऊ' हाच शब्द वापरायला हवा होता.

अनुवादाच्या पाश्चिमात्य संकल्पना आपण जशास तशा स्वीकारू शकत नाही. आपण भारतीयांनी आपल्या सांस्कृतिक पर्यावरणाला केंद्रवर्ती ठेवून त्या आकारल्या पाहिजेत.

पाश्चिमात्य समाजात अनुवादकाला दोन भाषा फक्त चांगल्या आल्या की पुरे असते, त्यांच्यात संस्कृतीचे सपाटीकरण असते; पण त्याप्रमाणे भारतीय अनुवादकाला फक्त त्या दोन भाषा चांगल्या येऊन चालणार नाही. त्याला संस्कृती संदर्भ माहिती असायला लागतात. देशाबाहेरच्या इंग्रजी साहित्यकृती बाबतीत उच्चारही नेमके करता यावे लागतात. पॅरिस, रोम, इटली इ. ठिकाणी घडलेल्या घटना इंग्रजीत येतात. फ्रेंच भाषेचा मोठा प्रभाव इंग्रजीवर असतो. त्यामुळे स्पेलिंग आणि उच्चार यात फरक असतो. godard मध्ये शेवटचा d हा silent असतो. त्याचा उच्चार गोदार असा होतो. Francoise असे स्पेलिंग असते; पण त्याचा उच्चार फ्रान्झ्वा असा होतो. Truffaut चा उच्च्चार ट्रूफौ असा होतो. wedding officer ही इटालियन इंग्रजीतील कादंबरी मराठीत आणताना इटालियन उच्चार कसे तो मोठा प्रश्न उपस्थित झाला. अनुवादकाने गोवा विद्यापीठातील इटालियन, पोर्तुगीज, रशियन भाषेतील माणसे मदतीला घेतली. इंग्रजी भाषेत उच्चारांची वर्णमाला का विकसित झाली त्याची अशा वेळी कल्पना येते. शब्दाच्या phonetics सह इंग्रजी शब्दकोश असतात. इंग्रजीतून मराठीत अनुवाद करणाऱ्या जवळ असे शब्दकोश असायलाच हवेत. अनुवादातून खूप दूरचे जग वाचकाला आपल्या भाषेतून कळते. कवीची लेखनपूर्व आत्मनिष्ठा कार्यरत असते असे जे आपण म्हणतो त्या धर्तीवर अनुवादकाची लेखनपूर्व तपस्या असे म्हणावे लागेल. wedding officer मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटच्या टप्प्यावरचे एक वास्तव चित्रित झाले आहे. इटलीवर अमेरिकेचा कब्जा बसलाय. अमेरिका, ब्रिटन यांनी झोन वाटून घेतले आहेत. युद्धात फार मोठ्या प्रमाणात पुरुष मारले गेलेत. मागे उरलेल्या स्त्रियांना जिवंत राहायचे तर खायचे काय हा प्रश्न आहे. बहुतेक सर्व स्त्रिया वेश्याव्यवसाय करताहेत. युद्धात भाग घेत असलेले सैनिक घरापासून दूर राहताहेत, वासना

तर आहेतच, ते त्या थेंबभर तेलासाठी, घासभर अन्नासाठी तळमळत असणाऱ्या स्त्रियांकडे आकर्षित होताहेत. शरीरसंबंधातून सैनिक रोगट होताहेत. काही सैनिक त्या स्त्रियांशी लग्न करू पाहताहेत. त्यांना त्यापासून रोखण्यासाठी wedding officer ही जागा निर्माण केली जाते. त्या जागेवर एक ब्रिटिश अधिकार नेमला जातो. सैनिकांनी निवडलेली बाई वेश्या, वेडी आहे असे सिद्ध करून त्याला लग्नाची परवानगी नाकारण्याचे त्याने काम करायचे आहे. पण हा अधिकारीच लीडीयाच्या प्रेमात पडतो. ती सैन्याची स्वयंपाकीण म्हणून काम करत असते. इटलीतील उत्तम खाद्यपदार्थ मराठीत आणताना कसोटी लागते.

आशा दामले यांनी टोनो मोरिसनची अनेक पुस्तके मराठीत आणली. गौरी देशपांडे यांनी आहे मनोहर तरी इंग्रजीत नेले. शांता गोखले यांनी दुर्गा खोटेचे आत्मचरित्र इंग्रजीत नेलेय, जे. डी. पिंटो मराठीत आणलेत. आधुनिक मराठी साहित्याच्या प्रारंभी तर इंग्रजीतील अनेक सुप्रसिद्ध नाटके मराठीत अनुवादित झाली. रेखा देशपांडे यांनी अमेरिकन लेखिका अगाथा ख्रिस्थीच्या जगप्रसिद्ध रहस्यकथा मराठीत आणल्या. इंग्रजीतील ती एक महत्त्वाची शैलीकार लेखिका ठरली आहे. ते सर्व बारा खंड मराठीत आले आहेत. शेवटच्या नाट्यात कर्टन या आपल्या नायकाला ती मारून टाकते. इतर कोणी त्याचा वापर करू नये म्हणून. १९२०-३० च्या दशकात मेसोपोटोमिया इजिप्तमध्ये या कथा घडतात. इंग्रजीचे अनुवाद करताना दिवस रात्र संध्याकाळ असे कालदर्शक शब्द वापरावे लागतात. कारण वेळा नमूद करून काल मराठी वाचकाच्या लक्षात येणार नाही. उन्हाळ्यात १० वाजले तरी सूर्यास्त होत नाही. हिवाळ्यात ३ वाजले तरी सूर्यास्त झालेला असत नाही. इंग्रजी भाषेत किंग्ज इंग्लिश, क्विन्स इंग्लिश असे भाषिक भेद असतात. त्या त्या प्रमाणे संदर्भ बदलतात. जुनी इंग्लिश आणि नवी इंग्लिश यात जसे अंतर असते तसेच मराठी भाषेमध्येसुद्धा नवे पारिभाषिक शब्द रूढ होत असतात या सर्व भाषिक स्थित्यंतरांकडे अनुवादकाचे सूक्ष्म लक्ष असणे अत्यावश्यक आहे. शब्दांवर, संज्ञांवर आणि भाषिक घटनांवर तर अनुवादाची सारी भिस्त अवलंबून असते. शिवाय समजावून घेणे आणि सांगणे हा संवादी स्थायीभाव येथे केंद्रवर्ती असतो त्यामुळे वाचकांचा विचार केला तर मराठीतून इंग्रजीत जाताना कोणता वाचक दृष्टीसमोर ठेवायचा? हा प्रश्न इथे समोर येतोच. एकूण उपलब्ध अनुवादित साहित्याच्या साह्याने आपण या साहित्य प्रकाराकडे पाहण्याचा साक्षेपी दृष्टिकोन आकारास आणू शकतो.

इंग्रजी अनुवाद या संज्ञेत देशाबाहेर जाणारे अनुवाद आणि देशातल्या देशात वाचले

जाणारे अनुवाद असे दोन विभाग पाडावे लागणार की काय? यावर चर्चा करू शकतो. परकीय साहित्यकृतींचे आपल्या भाषेत होणारे अनुवाद यांचा एक विभाग आणि इतर भारतीय भाषांतील साहित्य इंग्रजीत अनुवादित होणे हा दुसरा विभाग करावा लागेल. या दोन्ही विभागातील अनुवादांकडे पाहण्याचे निकष अर्थातच काही प्रमाणात बदलतील.

भारतीय साहित्य प्रांतात सोळा प्रमुख भारतीय भाषा अस्तित्वात आहेत. त्यांच्यामध्ये एक दुवा निर्माण व्हावा या दृष्टीतून भाषेचा जोडभाषा म्हणून अनुवादकांसाठी उपयोग भारतीय पर्यावरणात योग्य ठरेल असे वाटून तसे प्रयत्नही झाले आहेत. पण बहुभाषिक संस्कृती असलेल्या भारतीय पर्यावरणात इंग्रजीचा खरा उपयोग आपल्याला किती प्रमाणात झाला याचा सारासार विचार करण्याची निकड आज निर्माण झाली आहे.

भालचंद्र नेमाडे यांच्या हिंदूचा कन्नडमध्ये अनुवाद जो केला जातो आहे त्या प्रक्रियेत काही समस्या निर्माण झाल्या. उदा. हिंदू मुसलमान यांच्या दीर्घ सहवासाचे द्योतक मराठीतील संख्यावाटेही लेखक अधोरेखित करतात. उच्चार एकवीस पण लेखन उलटे. मात्र कन्नडमध्ये संख्या जशा म्हणतात तशाच लिहितात. दुसरे म्हणजे लेखकाने मराठी बोलींचा केलेला समर्थ वापर हे हिंदूचे फार महत्त्वाचे बलस्थान अनुवादात कसे पोहचवणार हा प्रश्न येतो. या कलाकृतीचा इंग्रजी अनुवाद भाषिक अंगांच्या सामर्थ्याचा विचार करता सपाट होईल की काय असा प्रश्न पडतो. अशा ठिकाणी अनुवादकाची कसोटी लागेल. अनुवादकालाही कलावंतांप्रमाणेच उंच व्हावे लागेल. खोल जावे लागेल. प्रत्येक भाषेत बोलींचे वैपुल्य अस्तित्वात असतेच, ते मराठीत आहे, कन्नडमध्ये आहे आणि इंग्रजीतही ते आहेच. पण ते वैपुल्य त्या त्या भाषिकांनाच जात असते. पिग्मेलिअनची नायिका जशी लोक पातळी आणि प्रमाण पातळी या दोन्हीमधील संपन्नतेची प्रतिनिधी बनते तसे लक्ष्य अनुवादकाला ठेवावे लागेल की काय? अनुवादक जर केवळ प्रमाण भाषेवर प्रभुत्व राखत असेल तर तेवढे कौशल्य पुरे पडणार नाही. हिंदूसारखी कलाकृती भाषिक पातळीवरूनही देशीतत्त्व कसे राखू पाहते हे तिच्या अनुवादाची प्रक्रिया स्पष्ट करेल. आशय पोहचवता येईल; पण भाषिक सामर्थ्यावाचून आशय कलाकृती म्हणून स्पर्श करतो का? अनंत मूर्ती यांची बहुचर्चित 'संस्कार' ही कादंबरी अशा कोणत्याही अडचणीशिवाय इंग्रजीत गेली. नोबेलसाठी चर्चेला ठेवल्यावर इंग्रजी मंडळाने स्वीडनमध्ये यात समस्या कुठे आहे? एक मरण पावलेल्या माणसाचे अंत्यसंस्कार कोणत्या पद्धतीने करायचे हे ठरवता न येणे ही मोठी समस्या होते का? असे प्रश्न उपस्थित केले!

तेव्हा आपण याठिकाणी अनुवाद प्रक्रिया स्वरूप व्याप्ती या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयाचा प्रामुख्याने इंग्रजी व मराठी भाषांसंदर्भात एक धावता असा विचार समोर ठेवण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न परिपूर्ण आहे असा माझा दावा नाही. विषयाला फक्त एक सुरुवात करून दिली आहे. पुढच्या सर्व सत्रातील मान्यवर संशोधक आपापल्या पद्धतीने हा विषय पुढे नेतील व अखेरीस आपल्याला ठोस अशी विधाने सापडण्याची दिशा हाती येईल. दोन्ही दिवसात संपन्न होणाऱ्या प्रत्येक सत्राला शुभेच्छा देऊन थांबते. आपण सर्वांनी शांतपणे माझे हे स्वैर विचार ऐकून घेतले याबद्दल धन्यवाद!